**७. विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रे अपलोड करणे :-**

**एक)** प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने परीक्षेकरिता अर्ज सादर करताना खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ तसेच प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाचा दावा करणाऱ्य उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

**दोन)** विविध सामाजकि व समांतर आरक्षणचा दावा करणाऱ्या उमेदवारांची पात्रता आजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे / प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र | प्रमाणपत्र / कागदपत्र | फाईल फॉर्मट | किमान फाईल साईज (K.B) | कमाल फाईल साईज (K.B) |
|---|---|---|---|---|
| १ | अर्जातील नावाचा पुराव (एस.एस.सी अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता) | PDF | | |
| २ | वयाचा पुरावा | PDF | | |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | PDF | | |
| ४ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | | |
| ५ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक असल्याबाबतचा पुरावा | PDF | | |
| ६ | अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र | PDF | | |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा | PDF | | |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | PDF | | |
| ९ | खेळाडू आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा | PDF | | |
| १० | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा | PDF | | |
| ११ | प्रकल्पग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा | PDF | | |
| १२ | भूकंपग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा | PDF | | |
| १३ | अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा. | PDF | | |
| १४ | अराखीव महिला, मागासवर्गीय, आ.दु.व, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | PDF | | |
| १५ | एस.एस.सी नावात बदल झाल्याचा पुरावा | PDF | | |
| १६ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | PDF | | |
| १७ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | PDF | | |
| १८ | विहित नमुन्यातील अनुभव प्रमाणपत्र ( ज्या संवर्गाकरीता लागू असल्यास) | PDF | | |
| १८ | MS-CIT प्रमाणपत्र अथवा शासन मान्य | PDF | | |

**तीन)** उपरोक्त प्रमाणपत्र / कागदपत्रे Mahabhumi संकेतस्थळावरील उपलब्ध लिंकवर उमेदवारांना सर्वसाधारण सूचना मध्ये प्रस्तृत जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

**चार)** खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ तसेच प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाच्या दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे / कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.